IMPACT FACTOR (SJIF) 2021 = 7.380 ISSN 2319-4766

SRJIS

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE 2021, VOL- 10, ISSUE-50


## Special Issue of Department of Economics, Lokmanya Mahavidyalay Warora, Dist. Chandrapur (MS)

on

## SELF - RELIANT INDIA (ATMANIRBHAR BHARAT) - OPPORTUNITIES AND CHALLENGES

**Chief Editor**
Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**
Dr. Ravindra Bapurao Shende




Book 2

153

| | | |
|---|---|---|
| 79 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आत्मनिर्भर कृषी विषयक विचार<br>*प्रा. स्वप्निल एस. बोबडे* | 413-416 |
| 80 | कोवीड-१९ आणि भारतातील तरूण बेरोजगारीचा एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. लालचंद किसन रामटेके* | 417-421 |
| 81 | कोविड-१९ चा स्थलांतरित कामगारांवरील परिणाम<br>*डॉ. समित माहोरे & डॉ. धीरज कदम* | 422-428 |
| 82 | खाद्यसुरक्षा आणि आत्मनिर्भरता: भारताच्या संदर्भात<br>*डॉ. विठ्ठल घिनमिने* | 429-435 |
| 83 | कोव्हिड-19 चे मानवी जीवनावरील परिणाम - एक चिंतन<br>*प्रा. डॉ. सौ. सुनिता एस. राठोड* | 436-440 |
| 84 | आत्मनिर्भर भारत अभियानाचे प्रमुख स्तंभ आणि पॅकेज अंतर्गत सुधारणांचे प्रोत्साहन पर तपशिल - एक आढावा<br>*डॉ. हितेश भा. दडमल* | 441-451 |
| 85 | गिग अर्थव्यवस्था: भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात एक समिक्षा<br>*प्रा. निहार बोदेले* | 452-458 |
| 86 | विकासाची उदयोन्मुख आव्हाने आणि आत्मनिर्भर भारत अभियान<br>*डॉ. विशाल वासुदेवराव मालेकार* | 459-463 |

# गिग अर्थव्यवस्था: भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात एक समिक्षा

प्रा. निहार बोदेले

*सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, आदर्श कला व वाणिज्य महाविद्यालय, देसाईगंज, जि. गडचिरोली.*

*niharbodele@gmail.com ९४२२३५४५४३*

## सारांश

*वैश्विकरण व डिजिटलीकरणामूळे जागात उत्पादन व विनिमय पध्दतीत मोठया प्रमाणात बदल होत आहेत. इंटरनेटच्या क्रांतीकारक विकासामूळे जागतिक सिमांचा प्रश्नच उरला नाही. या डिजिटलकरणामूळे रोजगार व उत्पादनाच्या नविन संकल्पना स्थापित होत आहेत. त्यामूळे प्रस्थापित व्यवस्था मोडीत निघत आहेत अलीकडे स्थापित होत असलेली गिग अर्थव्यवस्था हे याचेच प्रभावक्षेत्र आहे. पारंपारिक रोजगाराच्या ऐवजी गिग कार्य मोठ्या प्रमाणत वाढत आहे. गिग अर्थव्यवस्थेत उपजीविकासाठी आवश्यक अनेक सेवा गिग कार्यातून मिळविण्यात येत आहे त्यामूळे पारंपारिक रोजगाराचे स्वरूप बदलत आहे. या व्यवस्थेत सेवायोजक व श्रमिकाच्या संबंधात परिवर्तन होत आहे. श्रमिक आपल्या आवडीनुसार व सवडीनुसार काम करतो आहे. तर सेवायोजक आवश्यक ते कार्य गिग कार्यातून करवून घेतो इतक औपचारिक संबंध दिसून येत आहेत. भारतासारख्या देशात डिजिटलकरणामूळे रोजगाराचा क्षेत्र वाढत जरी असले तरी श्रमिक संबंध व त्याच्या कार्यपध्दीत बदल दिसून येत आहे. या गिग अर्थव्यवस्थेमूळे श्रमिकांच्या संबंधात कार्यातील नियमितपणा, श्रम कल्याण, सुरक्षितता या अनेक प्रश्न निर्माण होवून त्याचे दुरगामी परिणाम श्रमिक व अर्थव्यवस्थेवर निश्चितच होईल. आत्मनिर्भर भारत च्या दिशेने वाटचाल करीत असतांना गिग अर्थव्यवस्थे निर्माण होणाऱ्या समस्येकडे दुर्लक्ष करून चालनार नाही.*

*कळीचे ब्द : गिग अर्थव्यवस्था, डिजिटलकरण, रोजगार, श्रमिक संबंध*

## प्रास्ताविक :

आधुनिक डिजीटलीकरणाच्या काळात रोजगार व रोजगाराची परिभा ा बदलत आहे. जगात होत असलेली डिजिटल क्रांती व विशे ीकरणामुळे रोजगारासंबंधात रोजगाराच्या नवीन संकल्पना स्थापित होत आहेत. रोजगाराचे आता पारंपारीक स्वरूप बदलेले असून सेवायोजनक विशि ट कालावधीसाठी विशे ीकरणानुसार व्यक्तीच्या सेवा वापरल्या जातात. त्या कालावधी नंतर सेवा देणारा त्या कार्यातून मुक्त होतो. या स्वरूपाची रोजगाराची नविन संकल्पना व कार्यपध्दती स्थापीत होत आहे. रोजगाराची ही नवीन बदलेली परिभा ा जागतिक स्वरूपाची असून जगात जे डिजीटल परिवर्तने होत आहेत त्याबरोबर ही रोजगार अथवा कार्यपध्दती स्थापीत होत आहे. रोजगाराच्या या पध्दतीला फ्रिलान्स किंवा स्वतंत्र कार्य, प्रोजेक्ट आधारित कार्य म्हणतात. आज संपूर्ण जगात हि रोजगाराची नवीन कार्यपध्दती विकसीत होत आहे आणि अनेक अर्थव्यवस्थेमध्ये या स्वरूपाचे रोजगार दिसून येत आहे व त्याचे प्रमाण वाढत आहे. अलीकडे अशा स्वरूपाच्या विकसित होत असलेल्या वैश्विक अर्थव्यवस्थेला 'गिग अर्थव्यवस्था' म्हटल्या जात आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या या नवीन स्वरूपाचे स्विकार करण्यात आले असून भारतीय अर्थव्यवस्थेतील रोजगाराचा मोठा भाग हा गिग अर्थव्यवस्थेवत मोडतो. अमेरिका किंवा इतर विकसित देशाच्या तुलनेत भारतात गिग अर्थव्यवस्थेचा प्रमाण अधिक आहे परंतू अमेरिका व इतर विकसित देशाच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेचे आर्थिक परिदृश्य भिन्न आहे अमेरिका व इतर रा ट्रातील जनता स्वच्छेने गिग स्वरूपाच्या रोजगारीत आहे परंतू भारतीय अर्थव्यवस्थेत मात्र या स्वरूपाच्या कार्याला अनैच्छिक स्वरूपात स्विकारावे लागत आहे. परंतू अलीकडे भारतीय अर्थव्यवस्थेतील डिजिटल विकास व चौथ्या औद्योगिक क्रांतीचा परिपेक्षात भारतातील आजच्या युवा पिढीने रोजगाराचे नै नविन स्वरूप स्विकारले आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप, श्रमशक्ती, रोजगाराचे स्थिती या बाबीचा विचार केल्यास भारताच्या अर्थव्यवस्थेच्या संदर्भात गिग अर्थव्यवस्थेचे समिक्षा होणे आवश्यक आहे.



155